Reg. No. NP CITY/236/2018-20.

महाराष्ट्र शासन राजपत्र

असाधारण

प्राधिकृत प्रकाशन

वर्ष १२, अंक ३] गुरुवार, जानेवारी २९, २०२६/माघ ९, शके १९४७ [पृष्ठे २, किंमत : रुपये ५५.००

स्वतंत्र संकलन म्हणून फाईल करण्यासाठी प्रत्येक विभागाच्या पुरवणीला वेगळे पृष्ठ क्रमांक दिले आहेत.

भाग एक–नागपूर विभागीय पुरवणी

संकीर्ण अधिसूचना : नेमणुका, इ. इ. केवळ नागपूर विभागाशी संबंधित असलेले नियम व आदेश

भाग १ (असा.) (ना. वि. पु.) म. शा. रा.,अ. क्र. ४.

उपविभागीय अधिकारी तथा भूसंपादन अधिकारी, यांजकडून

भूमि संपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत करताना उचित भरपाई मिळण्याचा व पारदर्शकतेचा हक्क अधिनियम,

२०१३ कलम १९(१) अन्वये

अधिसूचना

क्रमांक कावि-अ. का.-उविअ-भूसंपा-गो.प्र.-४०-२०२६.—

ज्याअर्थी, समूचित शासन असलेल्या चंद्रपूर जिल्ह्याच्या जिल्हाधिकाऱ्याने, भूमि संपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत करताना उचित भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३ (२०१३ चा ३०) (यात यापुढे ज्याचा निर्देश "उक्त अधिनियम" असा केला आहे) यांच्या कलम ११ च्या पोट-कलम (१) व्दारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकाराचा वापर करुन, अधिसूचना क्रमांक ३११-२०१८, दिनांक १२ ऑक्टोबर, २०१८ अन्वये प्रारंभिक अधिसूचना काढली आहे आणि त्याव्दारे असे अधिसूचित केले आहे की, यासोबत जोडलेल्या अनुसूची-एकमध्ये अधिक तपशीलवार वर्णन केलेल्या जमिनीची, अनुसूची-दोनमध्ये अधिक तपशीलवार विनिर्दिष्ट केलेल्या सार्वजनिक प्रयोजनासाठी आवश्यकता आहे किंवा तिची आवश्यकता भासण्याची शक्यता आहे;

आणि ज्याअर्थी, चंद्रपूर (जिल्ह्याचा) जिल्हाधिकाऱ्याने कलम २१ च्या पोट-कलम (२) अन्वये दिलेला अहवाल, कोणताही असल्यास, विचारात घेतल्यानंतर, उक्त सार्वजनिक प्रयोजनासाठी उक्त जमीन संपादित करण्याची आवश्यकता आहे, याबात त्यांची खात्री पटली आहे.

आणि म्हणून उक्त अधिनियमाच्या कलम १९ च्या पोट-कलम (१) च्या तरतुदीन्वये, उक्त सार्वजनिक प्रयोजनासाठी उक्त जमिनीची आवश्यकता आहे, असे याव्दारे घोषित करण्यात येत आहे.

आणि ज्याअर्थी, अनुसूची-तीनमध्ये अधिक तपशीलवार वर्णन केलेले क्षेत्र हे बाधित कुंटूबियांच्या पुनर्वसन व पुनर्वसाहतीच्या प्रयोजनासाठी "पुनर्वसाहत क्षेत्र" म्हणून निर्धारित केले असल्याचे याव्दारे घोषित केले जात असून, पुनर्वसन व पुनर्वसाहत योजनेचा सारांश अनुसूची-चारमध्ये विनिर्दिष्ट केला आहे.

आणि म्हणून, त्याअर्थी, उक्त अधिनियमाच्या कलम ३ च्या खंड (छ) अन्वये, समूचित शासन असलेला जिल्हाधिकारी, उक्त अधिनियमान्वये जिल्हाधिकाऱ्यांची कार्ये पार पाडण्यासाठी उपविभागीय अधिकारी तथा भूसंपादन अधिकारी, ब्रम्हपुरी यांस पदनिर्देशित करीत आहे.

अनुसूची-एक

संपादित करवयाच्या जमिनीचे वर्णन

भूसंपादन प्रकरण क्रमांक ०३-एलए-६५-२०२५-२६, गाव - नवेगाव पांडव, तालुका - नागभिड, जिल्हा - चंद्रपूर, प.ह.नं. १०.

अ. क्र.	सर्व्हे क्र. किंवा गट क्र.	संपादनाखालील क्षेत्र (अदमासे)
(१)	(२)	(३)
		हे. आर
१	९/१	० १५
	एकूण . .	० १५

अनुसूची-दोन

सार्वजनिक प्रयोजनाच्या स्वरुपाबाबत विवरण

प्रकल्पाचे नाव	:-	गोसीखुर्द राष्ट्रीय प्रकल्प.
प्रकल्प कार्याचे वर्णन	:-	गोसीखुर्द प्रकल्पाअंतर्गत अड्याळ उपसा सिंचन योजनेच्या बांधकामाकरीता.
समाजाला मिळणारे लाभ	:-	गोसीखुर्द प्रकल्पामुळे १,९०,००० हे. आर क्षेत्रात सिंचनाचे लाभ प्राप्त होणार आहेत.

अनुसूची-तीन

पुनर्वसाहत क्षेत्राचे वर्णन

-निरंक-

अनुसूची-चार

पुनर्वसन व पुनर्वसाहत योजनेचा सारांश

-निरंक-

टीप - उक्त जमिनीच्या बाबत माहिती तथा नकाशे उपविभागीय अधिकारी तथा भूसंपादन अधिकारी, ब्रम्हपुरी यांचे कार्यालयामध्ये निरिक्षण करता येईल.

पर्वणी पाटील,
उपविभागीय अधिकारी
तथा
भूसंपादन अधिकारी,
ब्रम्हपुरी.

ब्रम्हपुरी :
दिनांक २० जानेवारी, २०२६.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE, PRINTED AT GOVERNMENT PRESS AND BOOK DEPOT, CIVIL LINES, NAGPUR-440 001 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI-400 004. EDITOR : DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE.